# <u>Evidence before Charge - Evidence</u>

**नि.फौ.ख.क्र.१२२६/२०१९**
**अशोक –वि– महेश व इतर**
**नि.क्र. २३**

**<u>तक्रारदारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>–**

मी या द्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नाव :– अशोक भिमराव विधाते,
वय :– ४० वर्ष व्यवसाय – गॅरेज,
राहणार :– चिंमडी, ता. खेड, जि. पुणे

**<u>तक्रारदारतर्फे सरतपासणी तक्रारदार अधिवक्ता श्री. सी.एम. माने यांचेतर्फे शपथेवर सुरू</u>** –

**०१.** घटना घडली त्यावेळी मी थेरगांव येथे राहत होतो. मी प्रस्तुतची तक्रार ही महेश खिवंसरा, बाबु चव्हाण यांचेविरूध्द दाखल केली. त्याचे कारण की, त्यांनी मला शॉपचा प्लॅन दिला नव्हता. मी सहा नंबरचा शॉप घेतला होता व तो शेजलपार्क, ए–विंग, केशवनगर, चिंचवड, पुणे येथे होता. मी तो शॉप दि.०६.०८.२०१४ मध्ये बाबु चव्हाण यांच्याकडून रू.तेरा लाख पंच्याहत्तर हजारला घेतला होता. सदर पुर्ण मोबदला मी त्यांना धनादेशाने अदा केली होती.

**०२.** सदर शॉपचे खरेदीखत हे दुय्यम निबंधक, हवेली क्र.५, चिचंवड, येथे नोंदविण्यात आले होते. मला बाबु चव्हाण याने सदर शॉपची मंजूरी आहे, टायटल क्लीअर आहे, त्याचे कर भरतो, असे सांगितले होते. तसेच बाबु चव्हाण मला बोलला होता की, त्याच्याकडे प्लॅनचे दस्त शेजलपार्क सोसायटीचे सचीव यांचेकडे आहे असे तो बोलला होता. तसेच तो मला म्हणाला होता की, सचिव गावाला गेला आहे व तो आल्यानंतर प्लॅन दस्त देतो म्हणून मी त्यांच्यावर भरसो ठेवला व पैसे देवून खरेदीखत नोंदणी केली.

**०३.** सहा महिन्यानंतर शेजलपार्क सोसायटीला महानगर पालिकेचा नोटीस आला होता.

**<u>मध्यांतरामुळे सरतपास तहकूब</u>**.

श्रवणोत्तर स्वीकृत,
sd/–
(मा.गो.मोरे)

दिनांक :–०३/०७/२०२४

**सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**पिंपरी, पुणे.**